अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

## इंग्लंडच्या फिरकीपुढे भारताचे फलंदाज ढेपाळले.. भारत १३४ धावांनी पिछाडीवर

**रांची** : भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी मालिकेतील चौथा सामना रांचीच्या मैदानावर खेळवण्यात येत आहे. प्रथम फलंदाजीसाठी उतरलेल्या इंग्लंडने पहिल्या डावात सर्वबाद ३५३ धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीसाठी मैदानात उतरलेल्या भारतीय संघाला दुसऱ्या दिवसअखेर ७ विकेट्स गमावत २१९ धावाच करता आल्या आहेत. इंग्लंडचा फिरकीपटू शोएब बशीरच्या फिरकीने भारतीय फलंदाजांना चांगलंच नाचवलय.

पहिल्या डावात ३५३ धावा केल्यानंतर इंग्लंडचा संघ गोलंदाजीसाठी उतरला. त्यानंतर टीम इंडियाला साजेशी कामगिरी करता आलेली नाही. शोएब बशीरने ४ विकेट्स पटकावत टीम इंडियाला धक्के दिले आहेत. त्यामुळे टीम इंडिया रांची कसोटीत १३४ धावांनी पिछाडीवर आहे. भारताकडून यशस्वी जैस्वाल शिवाय इतर कोणत्याही फलंदाजाला चांगली कामगिरी करता आलेली नाही. जैस्वालने %१ धावा करत टीम इंडियाकडून एकाकी झुंज दिली आहे. जैस्वाल शिवाय शुभमन गिलने ३८ धावांचे योगदान दिले आहे. तर ध्रुव जुरेल ३० धावा करुन नाबाद क्रिजवर आहे. भारताकडून, यशस्वी जैस्वाल ११७ चेंडूमध्ये ७३, शुभमल गिल ६५ चेंडूमध्ये ३८ धावा, रजत पाटीदार ४२ चेंडूमध्ये १% धावा आणि सरफराज खानने ५३ चेंडूमध्ये १४ धावांचे योगदान दिले. शिवाय, रवींद्र जाडेजा १२ धावा केल्या. कर्णधार रोहित शर्मा केवळ २ धावा करत तंबूत परतला.



। रविवार, दि. २५ फेब्रुवारी २०२४ ।

# मराठ्यांचा लढा रस्त्यावर!

## महामार्ग तीन तास रोखले | विद्यार्थ्यांना दिला रस्ता | विवाह सोडून आंदोलनात | सरकारविरोधात घोषणा

**सुराज्य/सोलापूर**

**मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणासाठी रस्त्यावर उतरण्याचा आदेश शिरसावंद्य मानत सोलापूर जिल्ह्यातील बहुतांश महामार्ग आज रोखण्यात आले. अभी नही तो कभी नही, अशा आवेशात उतरलेल्या मराठा आंदोलकांनी सोलापूर - पुणे महामार्ग आणि सोलापूर-कोल्हापूर महामार्ग रोखण्यात आला. दोन्ही नबाजूला गाड्यांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. तीन तास रस्ता रोखून धरल्यानंतर हे आंदोलन स्थगित करण्यात आले.**



### आंदोलकांची संवेदनशीलता

शाळेतून घरी परतणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होण्याची शक्यता होती. त्यामुळे या विद्यार्थ्यांना घेऊन जाणाऱ्या वाहनांसाठी आंदोलकांनी रस्ता मोकळा करून दिला. आम्हाला कोणाला त्रास द्यायचा नाही, मात्र आमच्या मागण्यांकडे सरकार गांभीर्याने लक्ष देत नसल्याचा आरोप त्यांनी केला.

राज्यभरात मराठा समाजाच्या वतीने मनोज जरांगे यांच्या सूचनेनुसार विविध मागण्यासाठी शनिवारी ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सोलापूर- कोल्हापूर महामार्गावर मारिआई चौकात मराठा आंदोलकांनी धडक दिली. रस्त्यावर ठिय्या मांडत वाहने अडवण्यात आली. कोंडी येथे समस्त मराठा समाज ग्रामस्थांनी पुणे -सोलापूर महामार्गांवर कोंडी येथे आरक्षणाच्या मागणीसाठी रस्ता रोखो आंदोलन केले. जरांगे पाटील यांच्या समर्थनाच्या घोषणा देत भगवा झेंडा हाती घेत भगवे टोप्या घालून मराठा आंदोलक आंदोलनाच्या मैदानात उतरले. आंदोलन सुरू असताना आरक्षणाच्या मागणीकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत राज्य सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

मराठा समाजाच्या विविध मागण्यासाठी मनोज जरांगे पाटील हे उपोषण करीत आहेत. सगेसोयरे या उल्लेखाच्या अधिसूचनेचे कायद्यात रूपांतर करून अंमलबजावणी करण्यात यावी. मराठा आंदोलकावरील गुन्हे मागे घेण्यात यावेत, मनोज जरांगे यांच्यावर बिनबुडाचे आरोप करणाऱ्यांवर कारवाई करावी आदी विविध मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.



### आधी लगीन आरक्षणाचे...

आरक्षणाची समाजाला असणारी निकड एका वेगळ्याच घटनेने अधोरेखित झाली. आपल्या विवाहाचा मुहूर्त चुकला तरी चालेल पण समाजाला आंदोलन मिळालेच या भावनेने नव दाम्पत्यांसह अख्खे वऱ्हाडच आंदोलनात सहभागी झाले. मोहोळ पंढरपूर पालखी महामार्गावर ही अनोखी घटना घडली. मोहोळच्या पश्चिमेकडील श्रीराम मंगल कार्यालयामध्ये प्रमोद विलास टेकळे (रा. पापरी) आणि प्रियांका अर्जुन मुळे (रा. ढोकबाभुळगाव )यांचा विवाह सोहळा होणार होता. माछ हे नव वधू आणि वरच डोक्याला मुंडावळ्या बांधलेल्या अवस्थेत या आंदोलनामध्ये सहभागी झाले. आता मिया बीबी राजी तो क्या करेगा काझी या उक्तीप्रमाणे त्यांच्यासोबत संपूर्ण वऱ्हाडच उत्स्फूर्तपणे रास्ता रोकोत सहभागी झाले. त्यामुळे मोहोळचे रास्ता रोको आंदोलन संपूर्ण राज्यात गाजत आहे. मोदी आणि शिंदे सरकारने मराठा समाजाची फसवणूक करत असून स्वतंत्र १० टक्के आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकणारे नसल्याने ५० टक्के कोट्यात ओबीसी वर्गातूनच मराठा समाजाला आरक्षण द्यावे ही जरांगे पाटील यांची मागणी योग्यच असल्याचे नववधू-वरांनी आंदोलनावेळी सांगितले.

- **अकलूज-टेंभूर्णी रस्ता रोखला...**
पान ६ वर
- **मोहोळमध्ये अजित पवारांविरोधात घोषणाबाजी**
पान ६ वर


## सुराज्य खुलासा

शुक्रवार दि.२३ फेब्रुवारी २०२४ च्या अंकात माजी आमदार दिलीप माने, पृथ्वीराज माने, निखील भोसले, नागेश ताकमोगे, तृप्ती भोसले, ॲड.गुरुदेवी कुद्री, नितीन भोपळे, स्नेहल माने यांच्यावर भारतीय दंड संहिता कलम ३७०, मानवी तस्करी, ३७६ डी सामुहिक बलात्कार आणि माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ (अ) अन्वये गुन्हा नोंदवण्यात येणार असे वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. वास्तविक पिडीतेने या संदर्भात खासगी तक्रार न्यायदंडाधिकारी यांच्यासमोर दाखल केली आहे. आणि न्यायालयाने प्रस्तावीत आरोपींविरुद्ध कारवाई करण्यासाठी पुरेसे कारण आहे की नाही याचा तपास करुन तसा अहवाल सादर करण्याचा आदेश फौजदार चावडी पोलीस स्टेशनला दिला आहे. प्रसिध्द झालेल्या या वृत्तामुळे संबंधीतांना जो मनस्ताप सहन करावा लागला याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करत आहोत.

— कार्यकारी संपादक

## तीन नवे फौजदारी कायदे एक जुलैपासून अस्तित्त्वात

**नवी दिल्ली** : भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष अधिनियम हे तीन नवे फौजदारी कायदे एक जुलैपासून वापरात येतील. या कायद्यांमुळे फौजदारी न्याय प्रक्रियेमध्ये अमुलाग्र बदल होणार असल्याचा दावा केला जात असला तरी, हीट अँड रन प्रकरणातील दंडाच्या तरतुदीला मात्र स्थगिती देण्यात आली आहे.



संसदेच्या हिवाळी अधिवेशनात हे कायदे मंजूर करण्यात आले होते. त्यावर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी २५ डिसेंबर रोजी स्वाक्षरी केली होती. नवे फौजदारी कायदे सर्व केंद्रशासित प्रदेशात लागू करण्याची सूचना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या महिन्यात केली होती. या कायद्याच्या अंमलबजावणीची अधिसुचना सरकारकडून शुक्रवारी काढण्यात आली.

ज्या अपघातात जीवितहानी होईल, त्यात चालकाला १० वर्ष कारावास आणि / अथवा दंड अशा शिक्षेची त्यात तरतूद करण्यात आली आहे. त्याविरोधात वाहतूक दारांच्या संघटनांनी देशभरात जानेवारी महिन्यात निदर्शने केली होती. त्यानंतर ही तरतूद ऑल इंडिया मोटार ट्रान्सपोर्ट कॉंग्रेसशी चर्चा करूनच लागू करण्यात येईल, असे आश्वासन केंद्र सरकारच्या वतीने देण्यात आले होते.

## 'तुतारी'चे रणशिंग बनवू | शरद पवार यांच्या हस्ते पक्षचिन्हाचे अनावरण

**रायगड** : सध्याच्या काळात रयतेचे राज्य आणण्यासाठी संघर्ष करावा लागणार आहे. या संघर्षाचे रणशिंग बनवण्यासाठी निवडणूक आयोगाने ही तुतारी हातात दिली आहे, अशा शब्दात आपला निश्चय राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी व्यक्त केला.



रायगड येथे पक्षाला बहाल करण्यात आलेल्या निवडणूक चिन्हाचे अनावरण एका सोहळ्यात करण्यात आले. पालखीच्या सहाय्याने शरद पवार ४० वर्षांनी स्वराज्याच्या राजधानीवर पोहोचले. शरद पवार यांच्या पुरोगामी विचार करणाऱ्या शेकडो कार्यकर्त्यांनी रायगड फुलून गेला होता. ऐतिहासिक असलेल्या या चिन्हाचं अनावरण किल्ले रायगडावर करण्यात आले.

यावेळी शरद पवार म्हणाले, राज्यात आणि देशात आमचा वैचारिक संघर्ष सुरू आहे. हा संघर्ष करायला शिवछत्रपतींची प्रेरणा आहे. देशात शेकडो राजे आणि संस्थानिक झाले मात्र रयतेचा राजा केवळ छत्रपती शिवाजी महाराजच होते. त्यांचे राज्य सर्व सामान्य माणसाचे आयुष्य संपन्न करणारे होते. आज राज्यात सामान्य माणसापुढे अडचणी वाढतील अशी स्थिती आहे. ही स्थिती बदलून जनतेचे राज्य आणण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. निवडणूक आयोगाने रणशिंग फुंकायला तुतारी दिली आहे.



### शरद पवार पालखीतून गडावर दाखल

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला 'तुतारी' हे चिन्ह बहाल करण्यात आले. या वाद्याला ऐतिहासिक परंपरा आहे. त्यामुळे महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवरायांची राजधानी असणाऱ्या रायगडची निवड या चिन्हाच्या अनावरणासाठी करण्यात आली. रायगडची वाट अनवट आहे. शरद पवार यांचे ८४ वय पाहता ते कसे येणार याबाबत साशंकता होती. मात्र रोपवेने ते रायगडावर आले. त्यानंतर त्यांनी पालखीने कार्यक्रमस्थळाकडे प्रस्थान केले.

## तोल-मोल के बोल...



सांगोला आणि पंढरपूर तालुक्यात रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी मोठे काम केले आहे. त्यामुळे माझा त्यांना व्यक्तीगत पाठींबा आहे. रणजितसिंह मोहिते पाटील यांना उमेदवारी दिली, तर पक्ष म्हणून काम करेन पण माझा पाठिंबा रणजितसिंह निंबाळकर यांनाच राहील. निंबाळकर यांनी पक्ष वगळून सर्वांचीच कामे वेगाने केली आहेत. त्यांच्यामुळे पाण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरत आहे. त्यामुळे त्यांना पाठींबा देणे हे आमचे कर्तव्य आहे .



शहाजीबापू पाटील
आमदार, सांगोला

## तिसरा डोळा

— प्रकाश पोरे



आपले कोण अन्.. ?

कल्याण
558-89-478

# अल्पवयीन विवाहितेच्या आत्महत्येला तबल दोन महिन्यांनी फुटली वाचा


## ▪ अंत्यविधी परस्पर उरकला; २ महिन्यांनी गुन्हा दाखल

**सुराज्य/सोलापूर**

**अल्पवयीन मुलीचा इच्छेविरूध्द झालेला विवाह सहन झाल्याने या मुलीने किटकनाशक पिऊन आत्महत्या केली. मात्र, त्याची कल्पना पोलिसांना न देता परस्पर अंत्यसंस्कार करण्याचा प्रकार तब्बल दोन महिन्यांनी उघडकीस आला. या प्रकरणी वडील, काका आणि पतीसह चार जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे माढा तालुक्यात एकच खळबळ उडाली आहे.**

दोन महिन्यापूर्वी झालेल्या अल्पवयीन विवाहित मुलीच्या अकस्मिक मृत्यूची पोलिसांना कल्पना न देता मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यात आल्याच्या या घटनेवरून एकच खळबळ उडाली आहे. माढा तालुक्यातील शिंदेवाडीत हा धक्कादायक प्रकार घडला होता. याची माहिती स्थानिक पोलीस पाटील यांना दोन महिन्यांनी समजली. त्यानंतर त्यांनी गुन्हा दाखल केला.

या घटनेत दाखल झालेल्या फिर्यादीच्या माहिती नुसार ही घटना माढ्याजवळील शिंदेवाडी गावात २४ डिसेंबर २०२३ रोजी मध्यरात्री नंतर घडली होती. तनुजा अनिल शिंदे (वय १४ रा. शिंदेवाडी) हिचे लग्न ती अल्पवयीन असतानाही तिचे वडील अनिल नारायण शिंदे व चुलते सुनील नारायण शिंदे यांनी लावून दिले होते. मात्र त्या विवाहास तिची संमती नव्हती. त्यामुळे तेथून पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना तिचे चुलते धनाजी शिंदे यांना ती दिसली. त्यावेळी चुलत्यांनी धनाजी यांनी तिच्या चुलत्यांना फोन करून कॅनॉलजवळ बोलावून घेतले. त्यावेळीही तिने काहीही माहिती सांगितली नाही. तेंव्हा दोघांनी तिला हाताने व काठीने मारहाण करून शेतातील घरी आणले. त्यानंतर रात्री सर्वजण झोपले असताना तनुजा हिने कीटकनाशक पिऊन करून आत्महत्या केली. ती मरण पावल्यानंतर चुलते आणि वडिलांनी याबाबतची वाच्यता केली नाही. त्याची माहिती कोणालाही न देता त्यांनी तिच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले.



दरम्यान या घटनेची कुणकूण पोलिस पाटील यांना लागली त्यांनी त्याची खातरजमा करून पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवली. फिर्याद दाखल होताच यातील असंवेदनशीलता पाहून खाकी वर्दीही हळहळली. त्यांनी आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्हा माढा पोलिस ठाण्यात दाखल केलाच. शिवाय अल्पवयीन असताना लग्न लावून दिल्याप्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला. या प्रकरणी संशयीत आरोपी म्हणून मृत मुलीचे वडील अनिल शिंदे, चुलते धनाजी शिंदे, सुनिल शिंदे आणि त्या मृत मुलीचा पती धनाजी जगताप या चार जणांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नेताजी बंडगर हे करीत आहेत.

# आप-काँग्रेस जागा वाटप फायनल

### दिल्ली, हरियाणा, गुजरात, चंदिगढ अन् गोव्यासाठी निश्चिती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था**

इंडिया आघाडीपुढे रोज नवी आव्हाने उभी रहात आहेत. मात्र आम आदमी पक्ष आणि काँग्रेसने मतभेदांवर मात करत लोकसभेसाठी दिल्ली, हरियाणा, गुजरात, चंदिगढ आणि गोव्यातील जागावाटप निश्चित केले आहे.

दिल्लीत पत्रकारपरिषदेत आपचे सौरभ भारद्वाज, अतिशी, संदीप पाठक आणि काँग्रेसचे मुकूल वासनिक, दीपक बबरिया, अरविंदसिंह लव्हली यांनी ही माहिती दिली. दिल्लीत आप चार तर काँग्रेस तीन जागांवर लढेल, असे त्यांनी स्पष्ट केले. आप दिल्ली दक्षिण, नवी दिल्ली, दिल्ली पश्चिम आणि दिल्ली उत्तर पश्चिम मतदारसंघात आपले उमेदवार उभे करतील. काँग्रेसकडे दिल्ली पूर्व, इशान्य दिल्ली आणि चांदनी चौक मतदारसंघ आले आहे. हरियाणात काँग्रेस नऊ जागांवर लढेल. तर कुरूक्षेत्र आपच्या वाट्याला आले आहे. तर गुजरातमध्ये आप भावनगर आणि भरुचमध्ये लढेल. काँग्रेस गोव्यातील दोन्ही आणि चंदिगढमध्ये लढेल.

ट्रस्ट रजि. नं.: ए. ६८० दि. २४/०९/१९७०

**श्री सद्‌गुरु प्रभाकर स्वामी महाराज मंदिर सार्वजनिक ट्रस्ट**
बुधवार पेठ, सम्राट चौक, सोलापूर.

**६७ वा पुण्यतिथी महोत्सव**



**गुलाल सोहळा**
मित्ती माघ वद्य प्रतिपदा
रविवार, दि. २५/२/२०२४, रात्रौ १०.४५ वा.

**लाडूप्रसाद वाटप**
सोमवार, दि. २६/२/२०२४, दु. १२ ते दु. ३
● शुभहस्ते ●
मा. श्री. विजय कबाडे
(पोलीस उपायुक्त, परिमंडळ)

**पालखी पूजा व रथ मिरवणूक**
मंगळवार, दि. २७/२/२०२४
सकाळी ११ ते रात्रौ ९ पर्यंत
● शुभहस्ते ●
मा. श्री. एम. राज कुमार
(पोलीस आयुक्त, सोलापूर शहर)

श्री. दत्तात्रय नि. देशमुख (चिफ ट्रस्टी), श्री. बाळकृष्ण लिं. शिंगाडे (मॅनेजिंग ट्रस्टी), ट्रस्टी: श्री. उदय अ. वैद्य, श्री. वसंत शे. बंडगर

टिप: १) गुलालाचा कार्यक्रम ईन सोलापूर केबलवर दाखविण्यात येईल. २) रविवार, दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी गुलालानंतर हैद्राबाद रोड-विडी घरकुल, पुर्व विभाग-गेंट्याल टॉकीज, विजयपूर रोड-हॉटेल सैफुल व श्री सिद्धेश्वर साखर कारखान्यापर्यंत बसची सोय करण्यात आली आहे.